# राजकीय पक्ष I Political Party

**राष्ट्रीय पक्ष** - राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळण्यासाठी निवडणूक आयोगाने स्पष्ट केलेल्या पुढील निकषांची पूर्तता व्हावी लागते.

(अ) चार किंवा अधिक राज्यांमध्ये लोकसभा किंवा विधानसभेच्या मागील निवडणुकीत किमान ६% वैध मते मिळवणे आवश्यक असते. तसेच मागील निवडणुकीत कोणत्याही राज्यातून अथवा राज्यांमधून किमान चार सदस्य लोकसभेवर निवडून आले पाहिजेत.

**किंवा**

(ब) एकूण लोकसभा मतदारसंघाच्या किमान २% मतदारसंघांमधून तसेच किमान तीन राज्यांमधून उमेदवार निवडून येणे आवश्यक असते.

## भारतीय राष्ट्रीय काँग्रेस :



- १८८५ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली.
- स्थापनेच्या वेळी काँग्रेस ही सर्वसमावेशक स्वरूपाची राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी करणारी चळवळ होती.
- स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस एकसर्वांत प्रभावी पक्ष म्हणून आकारास आला.
- धर्मनिरपेक्षता, सर्वांगीण विकास,दुर्बल घटकांसाठी आणि अल्पसंख्याक वर्गासाठी'समान हक्क, व्यापक समाजकल्याण' हे या पक्षाचे सुरुवातीपासूनचे धोरण आहे.
- लोकशाही समाजवाद,आंतरराष्ट्रीय शांतता व सामाजिक समता यांवर यापक्षाचा विश्वास आहे.

## भारतीय कम्युनिस्ट पक्ष :



- मार्क्सवादी विचारसरणीवर आधारलेल्याया पक्षाची स्थापना १९२५ साली झाली.
- भारतातला हा एक जुना पक्ष आहे.
- मजूर,कष्टकरी वर्ग व कामगारांच्या हितासाठी हा पक्ष कार्य करतो.
- या पक्षाचाभांडवलशाहीला विरोध आहे.
- १९६० च्या दशकात चीन व सोव्हिएट युनियन या दोन्ही साम्यवादी देशांपैकी कोणाचे नेतृत्व स्वीकारायचे, यावरून या पक्षातील नेत्यांमध्येवैचारिक मतभिन्नता निर्माण झाली व भारतीय कम्युनिस्ट पक्षात फूट पडली व त्यातून भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) हा पक्ष १९६४ साली स्थापन झाला.

## भारतीय जनता पक्ष




- भारतीय जनता पक्षहा राष्ट्रीय स्तरावरील एक महत्त्वाचा पक्ष आहे.
- भारतीय जनसंघ हा पक्ष १९५१ मध्ये स्थापन झाला.
- १९७७ मध्ये स्थापनझालेल्या जनता पक्षात भारतीय जनसंघ विलीन झाला, परंतु जनता पक्षाचे हे स्वरूप फारकाळ टिकले नाही.
- पक्ष फुटला व त्यातील भारतीय जनसंघाने भारतीय जनता पक्ष या नावाने १९८० मध्ये नवा पक्ष स्थापन केला.
- प्राचीनभारतीय संस्कृती, परंपरा यांचे जतन केले पाहिजे अशीया पक्षाची भूमिका आहे.

## भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) :



- धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही यांचा हा आदर करतो.
- साम्राज्यवादास या पक्षाचा विरोध आहे.
- कामगार,शेतकरी, शेतमजूर यांच्याहितसंबंधांची जपणूक करणे हे या पक्षाचे धोरण आहे.

## बहुजन समाज पक्ष :



- बहुजन समाज पक्ष समाजवादी विचारसरणीचा पक्ष आहे.
- बहुजनांचे हित हे या पक्षाचेउद्दिष्ट असून १९८४ साली या पक्षाची स्थापना झाली.
- दलित, आदिवासी,इतर मागासवर्गीय आणि अल्पसंख्य यांचा समावेश 'बहुजन' या शब्दात होतो.
- बहुजन समाजाला सत्ता मिळवून देणे हे या पक्षाचे उद्दिष्ट आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष :



- काँग्रेसमधून बाहेर पडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना १९९९ मध्ये झाली.
- लोकशाही, समता, धर्मनिरपेक्षता या मूल्यांवर पक्षाचा विश्वास आहे.
- काँग्रेस पक्षाबरोबर युती करून हा पक्ष १९९९ ते२०१४ पर्यंत महाराष्ट्रात सत्तेवर होता.
- तसेच केंद्रामध्येही २००४ ते २०१४ इतक्या प्रदीर्घ काळात हा पक्ष काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीचा एक घटक पक्ष होता.

## तृणमूल काँग्रेस :



- ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस या पक्षाची स्थापना १९९८ मध्ये झाली.
- २०१६ मध्ये निवडणूक आयोगाने या पक्षाला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता दिली.
- लोकशाही,धर्मनिरपेक्षता आणि दुर्बल घटकांचे संरक्षण हे या पक्षाचे धोरण आहे.

# प्रादेशिक किंवा राज्यपातळीवरील पक्ष

प्रादेशिक किंवा राज्यपातळीवरील पक्ष म्हणून मान्यता मिळवण्यासाठी निवडणूक आयोगाने पुढील निकष स्पष्ट केले आहेत.

(अ) लोकसभा किंवा विधानसभेच्या मागील निवडणुकीत किमान ६% मते मिळवणे आणि किमान दोन सदस्य विधानसभेवर निवडूनयेणेआवश्यकअसते.

**किंवा**

(ब) विधानसभेच्या एकूण सदस्यसंख्येच्या किमान ३% जागा किंवा किमान ३ जागा प्राप्त करणे आवश्यक आहे.

# काही प्रमुख प्रादेशिक किंवा राज्यपातळीवरील पक्ष

(१)



**शिवसेना**

- महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय पक्ष. १९६६ मध्ये स्थापना.
- मराठी माणसांच्या हक्कांची जपणूक, मराठी भाषेचे संवर्धन, परप्रांतीयांना विरोध.
- १९९५ मध्ये भारतीय जनता पक्षाशी युती करून शिवसेना हा पक्ष सर्वप्रथम महाराष्ट्रात सत्तेवर आला. २०१४ च्या निवडणुकीनंतर महाराष्ट्रात भाजपसोबत सत्तेत सहभागी.
- २०१९ मधील निवडणूकीनंतर काँग्रेस पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्या सोबत महाविकास आघाडी करुन सत्तेत.

(२)




**शिरोमणी अकाली दल**

- पंजाबमधील महत्वाचा प्रादेशिक पक्ष. १९२० मध्ये स्थापना.
- धार्मिक व प्रादेशिक अस्मिता जोपासण्यास प्राधान्य.
- पंजाबमध्ये अनेक वर्ष सत्तेवर.

(३)


**जम्मू आणि काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स**

- काश्मीरमधील प्रमुख प्रादेशिक पक्ष. १९३२ साली स्थापना.
- काश्मीरी जनतेच्या हितसंबंधांचा पाठपुरावा. स्वायत्तता जोपासण्यासाठी प्रयत्नशील.



(४)

**आसाम गण परिषद**



- सरकारबरोबरील वाटाघाटीतून १९८५ मध्ये आसाम करार. १९८५ साली स्थापना.
- निर्वासितांचे प्रश्न सोडवणे, आसामचे सांस्कृतिक, भाषिक व सामाजिक वेगळेपण जपणे. आर्थिक विकासासाठी प्रयत्न.
- गेली अनेक वर्षे आसाममध्ये सत्ताधारी पक्ष.

(५)

**द्रविड मुन्नेत्र कळघम**



१९२० मधल्या जस्टीस पार्टी या ब्राह्मणेतर चळवळीचे रूपांतर द्रविड मुन्नेत्र कळघम या राजकीय पक्षात झाले. १९४४ मध्ये जस्टीस पार्टी द्रविड कळघम म्हणून ओळखली जाऊ लागली. १९४९ मध्ये यातून एक गट बाहेर पडला व त्या गटाने द्रविड मुन्नेत्र कळघम पक्ष स्थापन केला. त्यातूनही बाहेर पडलेल्या एका गटाने ऑल इंडिया अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम या पक्षाची १९७२ मध्ये स्थापना केली.

तमिळ अस्मिता जोपासण्याचे प्रयत्न. केंद्राच्या आघाडीतही काही काळ सहभाग.

सर्व स्तरांवरील मतदारांचा पक्षाला पाठिंबा. सत्तेत दीर्घकाळ राहिल्याने अनेक उपाययोजना राबवल्या.